**निशाणी क्रं.**

दाखल तारीख : १५/१०/२०१५

नोंदणी तारीख : १५/१०/२०१५

निकाल तारीख : १०/०७/२०१८.

कालावधी : ०२ व. ०८म. २५दि.

# पिठासन अधिकारी, कामगार न्यायालय क्र. १ कोल्हापूर यांचे न्यायालयात

( पी. एम. मैंदर्गी यांचेसमोर )

**रेफरन्स (आय.डी.ए.) क्र. ८४/२०१५.**

(CNR No. MHLC09-000410-2015)

श्री.योगेश शिवराम बागडे (यंत्रमाग आस्थापना)
वॉर्ड नं. १६, बंडगर माळ, ज्ञानेश्वर गल्ली,
टायगर चौक, इचलकरंजी,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. **प्रथमपक्ष**

**आणि**

श्री. दिगंबर निवृत्ती चव्हाण,
द्वारा :– करवीर कामगार संघ (आयटक)
१६/२०२९, गोकुळ चौक, इचलकरंजी, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर. **द्वितीयपक्ष**

**विधिज्ञ** :–

श्री. किरण दि. कोष्टी विधिज्ञ प्रथमपक्षातर्फे

क्रॉ. हणमंत गणपती लोहार द्वितीयपक्षातर्फे

LABOUR COURT

# एकतर्फी निवाडा

( दिनांक १०/०७/२०१८ )

प्रस्तुतचा संदर्भ हा अपर कामगार आयुक्त, पुणे यांचेकडून या न्यायालयाकडे द्वितीय पक्षकार व प्रथमपक्षकार यांचेमध्ये निर्माण झालेल्या विवादाबाबत पाठवला आहे.

द्वितीय पक्षकाराचे मागणी निवेदन थोडक्यात खालीलप्रमाणे :—

२. द्वितीय पक्षकार हे प्रथमपक्षकार यांच्याकडे दि. १०/११/२०११ पासून विणकर मागवाला म्हणून काम करीत होते व त्यास दरमहा चार हजार रुपये पगार मिळत होता. नेहमीप्रमाणे द्वितीय पक्षकार हे दि. २०/११/२०१३ रोजी कामावर गेले असता त्याला कोणतीही लेखी नोटीस न देता तोंडी हुकुमाने बेकायदेशीरपणे अचानक कामावरुन कमी केले आहे. द्वितीय पक्षकार यांनी दि. २१/०३/२०१४ रोजी शॉप इन्स्पेक्टर यांच्याकडे लेखी तक्रार करुन कामावर घेणेची मागणी केली परंतु त्यास कामावर घेणेत आले नाही.

३. द्वितीय पक्षकार यांनी कथन केले आहे की, कारखान्यामध्ये किमान वेतन कायदयाची अंमलबजावणी, आठ तास काम, स्पेशल अलौन्स, हजेरी कार्ड देणेची मागणी व पगार पत्रक ठेवणेची मागणी द्वितीय पक्षकार यांनी केली असता तडकाफडकी तोंडी हुकुमाने त्यांना कामावरुन कमी करण्यात आले आहे. कामावरुन कमी करणेपूर्वी स्थायी आदेशाप्रमाणे लेखी आदेश दिला नाही, एक महिन्याची नोटीस अथवा एक महिन्याच्या नोटीसीइतका पगार द्वितीय पक्षकार यांना दिला नाही, कामावरुन कमी करणेपूर्वी चौकशी अधिकारी नेमून द्वितीय पक्षकार यांची चौकशी केली नाही. द्वितीय पक्षकार हे सध्या बेकार आहेत व त्यास कोठेही काम मिळालेले नाही. सबब, द्वितीय

LABOUR COURT

पक्षकार यांनी विनंती केली आहे की, त्यांना पूर्ववत सेवेमध्ये सलगता धरुन कामावर हजर करुन घेण्यात यावे व कामावर घेईपर्यंतच्या मधील काळातील किमान वेतनाप्रमाणे पूर्ण पगार मिळावा.

४. प्रथमपक्षकार यांना नि.क्र. ओ–४ प्रमाणे नोटीस मिळाल्याचे दिसून येते. नोटीस मिळाल्यानंतर प्रथमपक्षकार विधिज्ञामार्फत हजर झाले व त्यांनी मुदत वाढ मागणीचा अर्ज दिला. नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रथमपक्षकार यांना मुदत वाढ देण्यात आली, तथापि, त्यानंतर देखील ते प्रस्तुत प्रकरणात हजर झाले नाहीत व त्यांनी त्यांची कैफियत सादर केली नाही. सबब, दि. २३/०२/२०१८ रोजी प्रथमपक्षकार यांची कैफियत नाही, असा आदेश पारीत करण्यात आला.

५. द्वितीय पक्षकार यांची कथने विचारात घेवून मी पुढीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केले आहेत. सबब, सर्व मुद्यांवरील कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे देत आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १) प्रथमपक्ष यांनी द्वितीय पक्ष यांना दि. २०/११/२०१३ पासून कामावरुन बेकायदेशीररित्या कमी केल्याचे द्वितीय पक्षकार सिध्द करतात का ? | **होकारार्थी** |
| २) द्वितीय पक्षकार हे कामावरुन कमी केलेल्या तारखेपासून संपूर्ण वेतन व नोकरीच्या सलगतेसह पुर्ववत व्यवस्थापनाच्या सेवेत दाखल होण्याचा पात्र आहेत काय ? | **होकारार्थी** |
| ३) आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्रं. १ बाबत** :–

LABOUR COURT

६. मुद्दा क्रं. १ शाबीत करण्याकरिता द्वितीय पक्षकार यांनी प्रस्तुत कामात नि.क्र. यु—५ कडे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. प्रथमपक्षकार यांना जास्तीत जास्त संधी देवून देखील त्यांनी द्वितीय पक्षकार यांचा उलटतपास घेतला नाही. त्यानंतर प्रकरण प्रथमपक्षकाराच्या पुराव्यासाठी नेमण्यात आले असता, प्रथमपक्षकार यांना वारंवार संधी देवून देखील त्यांनी प्रकरणात पुरावा सादर न केल्याने प्रथमपक्षकाराचा दि. ०६/०७/२०१८ रोजीच्या आदेशाने पुरावा बंद करण्यात आला व प्रकरण युक्तिवादाकरिता नेमण्यात आले.

७. द्वितीय पक्षकारातर्फे प्रतिनिधी यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

८. द्वितीय पक्षकारातर्फे प्रतिनिधी यांनी युक्तिवाद केला की, प्रथमपक्षकार यांनी द्वितीय पक्षकार यांना कोणतीही पूर्वसूचना न देता तोंडी हुकुमाने तडकाफडकी दि. २१/११/२०१३ रोजी बेकायदेशीररित्या कामावरुन कमी केले आहे. कामावरुन कमी केल्यावर द्वितीय पक्षकार यांनी प्रथमपक्षकार यांचेकडे वेळोवेळी भेटून कामावर घेण्याची विनंती केली परंतु त्यांनी विचार करु असे आश्वासन दिले, मात्र कोणतीही पुर्तता केली नाही. द्वितीय पक्षकारातर्फे प्रतिनिधी यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, कारखान्यामध्ये किमान वेतन कायदयाची अंमलबजावणी, आठ तास काम, स्पेशल अलौंन्स, हजेरी कार्ड देणेची मागणी व पगार पत्रक ठेवणेची इत्यादीची मागणी द्वितीय पक्षकार यांनी केली असता तडकाफडकी तोंडी हुकुमाने त्यांना कामावरुन कमी करण्यात आले आहे. कामावरुन कमी करणेपूर्वी स्थायी आदेशाप्रमाणे लेखी आदेश दिला नाही, एक महिन्याची नोटीस अथवा एक महिन्याच्या नोटीसीइतका पगार द्वितीय पक्षकार यांना दिला नाही. त्यांनी असाही युक्तिवाद केला की, कामावरुन कमी करणेपूर्वी स्वतंत्र चौकशी अधिकारी नेमून द्वितीय पक्षकार यांची चौकशी केली नाही व नैसर्गिक न्यायतत्वानुसार बचावाची संधी देखील देण्यात आली नाही. द्वितीय पक्षकार हे सध्या बेकार आहेत व त्यास कोठेही काम मिळालेले नाही.

LABOUR COURT

९. प्रथमपक्षकार यांनी द्वितीय पक्षकार यांच्या पुराव्याच्या शपथपत्रातील कोणतीही कथने खोडून काढली नाहीत, त्यामुळे द्वितीय पक्षकार यांच्या पुराव्याच्या शपथपत्रातील कथने अबाधित राहिली आहेत. सबब, द्वितीय पक्षकार यांना प्रथमपक्षकार यांनी दिलेला दि. २०/११/२०१३ रोजीचा कामावरुन कमी करण्याचा आदेश हा बेकायदेशीर आहे, या मतास मी आलो आहे. सबब, मुद्दा क्रं. १ चे उत्तर मी होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्रं. २ बाबत** :—

१०. द्वितीय पक्षकार यांनी मुद्दा क्रं. १ शाबीत केल्यामुळे साहजीकच प्रथमपक्षकार यांनी द्वितीय पक्षकार यांना बचावाची नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन कोणतीही संधी न देता अथवा त्यांचेवरील आरोप कोणतीही खातेनिहाय चौकशी न करता त्यांना दि. २०/११/२०१३ पासून बेकायदेशीरपणे कामावरुन कमी केले आहे, ही बाब द्वितीय पक्षकार यांनी शाबीत केल्यामुळे द्वितीय पक्षकार हे त्यांना नोकरीतून कमी केलेल्या तारखेपासून आजअखेरच्या वेतनास पात्र आहेत, या मतास मी आलो आहे. सबब, मुद्दा क्रं. २ यास अनुसरुन द्वितीय पक्षकार हे कामावरुन कमी केलेल्या तारखेपासून संपूर्ण वेतनास व नोकरीच्या सलगतेसह पूर्ववत व्यवस्थापनाच्या सेवेत दाखल होण्यास पात्र आहेत, या मतास मी आलो आहे. सबब, मी मुद्दा क्रं. २ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे आणि पुढीलप्रमाणे निवाडा देत आहे,

## निवाडा

१. संदर्भ मंजूर करण्यात येतो.

२. प्रथमपक्षकार यांनी तोंडी हुकुमाने द्वितीय पक्षकार यांना दिलेला दि. २०/११/२०१३ रोजीचा नोकरीतून कमी केल्याचा आदेश हा बेकायदेशीर आहे, असे जाहीर करण्यात येते व सदर आदेश रद्दबातल करण्यात येतो.

३. द्वितीय पक्षकार यांना कामावरुन कमी केलेल्या तारखेपासून म्हणजेच दि. २०/११/२०१३ पासून मागील संपूर्ण वेतनासह व नोकरीच्या सलगतेसह पूर्ववत व्यवस्थापनाच्या सेवेत दाखल करुन घ्यावे, असे आदेश प्रथमपक्षकार यांना देण्यात येतात.

४. येणेप्रमाणे संदर्भ शासनास कळवावा व प्रकाशित करावा.

(प्रत्यक्षात संगणकावरती सांगितल्याने श्रुतलेखन घेऊन टंकलेखन नाही).

सही/—

कोल्हापूर ( पी.एम.मैंदर्गी )
दिनांक :—१०/०७/२०१८. पिठासन अधिकारी,
कामगार न्यायालय क्रं. १, कोल्हापूर.

Argued on :- 06/07/2018 Award transcribed on :- 10/07/2018

Award dictated on :-10/07/2018 Award checked and signed on :-11 / 07/2018

LABOUR COURT